चैत्र शुद्ध प्रतिपदा, नवीन वर्ष, नवा उत्साह,
नवा उल्हास, नव्या आकांक्षा, नवा विचार, नवा आनंद,
नवे सुख, सर्व काही नवे,
शुभारंभ !!!



www.saarthbodh.com

तुम्हा सर्वांना माझ्याकडून गुढीपाडव्याच्या हार्दिक शुभेच्छा !!!

पाहिले मी विश्व सारे, वर्णिता वाचा खुजे
शब्द पडती अपुरे, मज अजून काही नवे हवे ॥ १ ॥

चाललो वाटा किती, संक्षिप्त हर दिशा भासे
अजुनी आहे चालायचे, मज मार्ग काही नवे हवे ॥ २ ॥

कोणी होते सोबतीला, राहिले कोणी मागुती
दूरचा प्रवास माझा, सहप्रवासी काही नवे हवे ॥ ३ ॥

जाणतो आभाळ सारे, अन जाणतो अथांगता
ठाऊक हर तारका, मज तारांगण काही नवे हवे ॥ ४ ॥

तत्व चर्चिले बहु, कंठगत शास्त्र झाले
सांगण्या मनोगता, मज विचार काही नवे हवे ॥ ५ ॥

पाहिला परमेश्वरही, संभाषण ते रोजचे
एकरूप त्यात होण्या, मज मंत्र काही नवे हवे ॥ ६ ॥

नवीन वर्ष तुम्हा सर्वांना
भरभराटीचे, सुखाचे, आरोग्याचे, आनंदाचे, विश्वासाचे, श्रद्धेचे, मित्रत्वाचे जावो !!!

© सचिन पु. कुलकर्णी
www.saarthbodh.com
FB ID- sachin.kulkarni78